# दक्षता यंत्रणा/तक्रारदार धोरण

**1. <u>प्रास्ताविकः</u>**

कंपनी आपला व्यवसाय आणि व्यवहार कुशलता, प्रामाणिकपणा आणि नैतिक वर्तनाचे सर्वोच्च मानदंड पाळून चालविण्यास वचनबद्ध आहे. कंपनी आपल्या सर्व कर्मचा-यांना सुरक्षित आणि नैतिक कार्य संस्कृती उपलब्ध करुन देण्यासही वचनबद्ध आहे.

कंपनी कायदा, 2013 च्या कलम 177 च्या उप-कलम 9 आणि कंपनी (संचालक मंडळाच्या बैठका आणि त्याचे अधिकार) नियमावली, 2014 च्या नियम 7 मधील तरतुदींच्या अनुसार, सर्व कंपन्यांना एक दक्षता यंत्रणा स्थापित करणे अनिवार्य आहे, जेणेकरुन त्यांचे संचालक आणि कर्मचारी कोणतेही अनैतिक वर्तन किंवा अयोग्य कामाची माहिती नोंदवू शकतील.

तसेच 1 ऑक्टोबर, 2014 पासून लिस्टींग कराराच्या सुधारित परिच्छेद 49 अनुसार, सर्व सूचिबद्ध कंपन्यांनी अनैतिक वर्तन, प्रत्यक्ष किंवा संशयित घोटाळा किंवा कंपनीच्या आचार संहितेच्या उल्लंघनाबाबत चिंता नोंदवण्यासाठी संचालक आणि कर्मचा-यांसाठी ‘‘व्हिसल ब्लोअर धोरण’’ तयार करणे आवश्यक आहे.

कर्मचा-यांच्या ओळखीचे संरक्षण करण्यासंबंधी कंपनीमधील गंभीर अनियमिततांबद्दल चिंता व्यक्त करण्यासाठी कर्मचा-यांना एक चौकट उपलब्ध करण्याच्या उद्देशाने हे धोरण तयार करण्यात आले आहे.

**2. <u>व्याख्याः-</u>**

या धोरणामध्ये वापरलेल्या काही महत्वाच्या शब्दांची व्याख्या खाली दिलेली आहेः

i. **<u>“लेखा परीक्षण समिती”</u>** म्हणजे कंपनी कायदा, 2013 च्या कलम 177 अनुसार आणि शेअर बाजारांसोबत लिस्टींग कराराच्या परिच्छेद ४९ सहवाचन केल्यानुसार कंपनीच्या संचालक मंडळाद्वारे स्थापित लेखा परीक्षण समिती.

ii. **<u>“सक्षम प्राधिकरण”</u>** म्हणजे कंपनीचा मुख्य कार्यान्वयन अधिकारी-स्थानिक आणि मुख्य कार्यान्वनय अधिकारी-आंतरराष्ट्रीय आणि यामध्ये सदर धोरणाखाली वेळोवेळी दिले जाणारे अधिकारप्राप्त व्यक्ती समाविष्ट राहतील.

iii. **<u>“कर्मचारी”</u>** म्हणजे कंपनीचा प्रत्येक कर्मचारी (मग तो भारतात किंवा परदेशात काम करत असेल), यामध्ये कंपनीच्या नोकरीच असलेले संचालक समाविष्ट आहेत.

iv. **<u>“अन्वेषक”</u>** म्हणजे संरक्षित प्रकटनाच्या तपासामध्ये सहाय्याकरिता सक्षम अधिका-याद्वारे अधिकारदत्त, नियुक्त, सल्ला दिलेल्या किंवा संपर्क साधलेल्या व्यक्ती आणि यामध्ये कंपनीचे ऑडीटर्स आणि पोलीस समाविष्ट असतील.

v. **<u>“संरक्षित प्रकटन”</u>** म्हणजे चांगल्या भावनेनं केलेला कोणताही संवाद ज्यामध्ये अनैतिक किंवा अयोग्य कामाचा पुरावा देऊ शकेल अशी माहिती प्रकट किंवा सादर केली जाते.

vi. **<u>“प्रयोक्ता”</u>** म्हणजे एक व्यक्ती किंवा व्यक्तिंचा समूह ज्यांच्या विरुद्ध किंवा संदर्भात एक संरक्षित प्रकटन करण्यात आले आहे किंवा एखाद्या तपासाच्या दरम्यान पुरावा गोळा करण्यात आलेला आहे.

vii. **<u>“अनैतिक किंवा अयोग्य काम”</u>** म्हणजे मर्यादेविना खालील बाबीः-

a) अधिकाराचा गैरवापर.
b) कराराचा भंग.
c) कंपनीचा डाटा/नोंदींचा गैरवापर.
d) फौजदारी/दिवाणी प्रकारची कोणतीही बेकायदेशीर कृती.
e) हेतुपुरस्सर आर्थिक गैरव्यवहार, यामध्ये घोटाळा किंवा संशयित घोटाळा समाविष्ट आहे.
f) संपूर्णतः किंवा सहेतुक निष्काळजीपणा ज्यामुळे आरोग्य, सुरक्षितता आणि पर्यावरणाला मोठ्या प्रमाणात आणि विशिष्ट धोका होणे.
g) अन्य संचालक/व्यवसाय भागीदार/कर्मचारी किंवा दुर्बल प्रौढ यांच्यासोबत गैरवर्तन (उदा. शारीरिक, लैंगिक, मानसिक किंवा आर्थिक गैरवापर, पिळवणूक) द्वारे).

h) कंपनीचा निधी/मालमत्ता वाया घालवणे/अफरातफर करणे.
i) कंपनीच्या धोरणांचे उल्लंघन करणे.
j) गोपनीय/प्रोप्रायटरी माहिती पसरविणे.

**viii)** **"व्हिसल ब्लोअर"** म्हणजे सदर धोरणाखाली एक संरक्षित प्रकटन करणारी एखादी व्यक्ती.

**3. पात्रता:-**

सदर धोरणाखाली या कंपनीचे सर्व कर्मचारी संरक्षित प्रकटने करण्यास पात्र आहेत. ही संरक्षित प्रकटने कंपनीशी किंवा तिच्या कोणत्याही उप-कंपनीशी निगडीत मामल्यांबाबत असू शकतात.

**4. अपात्रता:-**

**a.** प्रामाणिक व्हिसल ब्लोअर्सना याठिकाणी नमूद केल्यानुसार कोणत्याही प्रकारच्या पक्षपाती वागणुकीपासून संपूर्ण संरक्षण देण्याची खात्री केली जाईल त्याचबरोबर, या संरक्षणाचा कोणताही गैरवापर केल्यास शिस्तभंगाची कारवाई केली जाईल.

**b.** सदर धोरणाखाली संरक्षण दिले जाणे याचा अर्थ व्हिसल ब्लोअरद्वारे करण्यात आलेल्या चुकीच्या आरोपांमधून उद्‌भवणाऱ्या शिस्तभंगाच्या कारवाईपासून संरक्षण असा होणार नाही जेव्हा की हे आरोप चुकीचे किंवा *बदनामीच्या* उद्देशाने केल्याचे माहिती असेल.

**c.** संरक्षित प्रकटने करणारे व्हिसल ब्लोअर्स, जे नंतर *वाईट हेतून किंवा बदनामीकारक* असल्याचे आढळून आले किंवा नंतर खोडसाळ, आधारहीन किंवा चांगल्या भावनेहून अन्यथा नोंदविली आहेत असे आढळून आलेली 3 किंवा अधिक संरक्षित प्रकटने करणाऱ्या व्हिसल ब्लोअर्सना, सदर धोरणाखाली पुढे संरक्षित प्रकटने करण्यापासून अपात्र ठरवले जाईल आणि ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील.

**5. प्रक्रिया:-**

सर्व संरक्षित प्रकटने तक्रारदाराने शक्य तितक्या लवकर नोंदवली पाहिजे, व्हिसल ब्लोअरला माहिती झाल्यापासून 30 दिवसांच्या आत नोंदवावीत आणि ती एकतर टाईप केलेली असावीत किंवा इंग्लिश किंवा हिंदी भाषेत किंवा व्हिसल ब्लोअरच्या रोजगाराच्या ठिकाणच्या प्रादेशिक भाषेत स्वच्छ अक्षरात लिहिलेली असावीत.

बेनामी प्रकटने, एक नियम म्हणून, स्विकारली जाणार नाहीत.

हे संरक्षित प्रकटन तक्रारदाराच्या स्वाक्षरीने एका कव्हरींग लेटरखाली बंद आणि सुरक्षित लिफाफ्यामध्ये सादर केले पाहिजे आणि त्यावर "**व्हिसल ब्लोअर धोरणाखाली संरक्षित प्रकटन**" असे लिहिलेले असावे किंवा ईमेलद्वारे विषय रकान्यात "**व्हिसल ब्लोअर धोरणाखाली संरक्षित प्रकटन"** असे लिहून पाठवावे. जर या तक्रारीच्या लिफाफ्यावर वरीलप्रमाणे लिहिले नसेल किंवा बंद लिफाफ्यात नसेल तर, सदर धोरणामध्ये नमूद केल्यानुसार व्हिसल ब्लोअरला संरक्षण पुरविणे शक्य होणार नाही.
सर्व संरक्षित प्रकटने कंपनीच्या सक्षम अधिकाऱ्याला किंवा अपवादात्मक प्रसंगांमध्ये लेखा परीक्षण समितीकडे पाठवावीत.

सक्षम अधिकाऱ्याचा संपर्क तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| | |
|---|---|
| **नाव आणि पत्ता** | श्री भीषम वढेरा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>ओमेक्स स्क्वेअर, प्लॉट क्र. 14, जसोला जिल्हा केंद्र, जसोला, नवी दिल्ली - 110025 |
| **ईमेल आयडी** | chatwithbhisham-gpi@modi.com |

हा सक्षम अधिकारी कव्हरींग लेटर विलग करेल आणि केवळ संरक्षित प्रकटन तपासाकरिता अन्वेषकांकडे पाठवेल.

**6. तपास आणि अन्वेषकांची भूमिका:-**

**a)** उपस्थित केलेल्या मुद्यावर अंतर्गत तपास केला जाईल किंवा व्हिसल ब्लोअरने उपस्थित केलेल्या मुद्याचे स्वरुप पाहून बाह्य अन्वेषकाकडे सोपवला जाईल.

b) सक्षम अधिका-याने तपास करण्याचा घेतलेला निर्णय म्हणजे एक आरोप ठरत नाही आणि त्याला एक तटस्थ सत्य-शोधन प्रक्रिया म्हटले जावे. या तपासाचा निष्कर्ष एक अयोग्य किंवा अनैतिक कृती करण्यात आली होती या व्हिसल ब्लोअरच्या निष्कर्षाला समर्थन न करण्याची शक्यता आहे.

c) औपचारिक तपासाच्या आरंभी प्रयोक्त्यांना आरोपांची सामान्यतः माहिती दिली जाईल आणि तपासाच्या दरम्यान आपलेल म्हणणे मांडण्याची संधी त्यांना दिली जाईल.

d) तपासाच्या दरम्यान सक्षम अधिकारी किंवा कोणत्याही अन्वेषकाला अशा प्रमाणापर्यंत सहकार्य करणे आवश्यक राहील की अशा सहकार्यामुळे लागू कायद्यांखाली उपलब्ध सेल्फ-इनक्रिमिनेशन संरक्षणांशी तडजोड होणार नाही.

e) प्रयोक्त्यांना अन्वेषक आणि/किंवा लेखा परीक्षण समितीचे सदस्य आणि/किंवा व्हिसल ब्लोअरहून अन्य आपल्या पसंतीची व्यक्ती किंवा व्यक्तिंसोबत सल्लामसलत करण्याचा अधिकार राहील. तपास प्रक्रियेमध्ये आपलं प्रतिनिधीत्व करण्यासाठी आपल्या खर्चाने वकील नियुक्त करण्यास प्रयोक्त्यांना सदैव मुभा राहील. परंतु, प्रयोक्त्याच्या विरुद्ध आरोप सिद्ध झाले नाहीत तर, हा खर्च भरुन देण्याचा विचार कंपनी करु शकते.

f) प्रयोक्त्यांना या तपासाच्या निष्कर्षाची माहिती मिळण्याचा अधिकार राहील.

g) संरक्षित प्रकटन प्राप्त झाल्यानंतर 45 दिवसांच्या आत शक्यतो हा तपास पूर्ण केला जाईल आणि 45 दिवसांच्या पलीकडे कोणताही विलंब झाल्यास अन्वेषण अहवालात त्यांचे स्पष्टीकरण दिले जाईल.

अन्वेषकांची भूमिका खालीलप्रमाणे राहीलः

i. अन्वेषकांना सत्य-शोधन आणि विश्लेषणासाठी एक प्रक्रिया संचालित करणे आवश्यक असते.

ii. सर्व अन्वेषक स्वतंत्र असतील आणि वस्तुस्थिती आणि संकल्पना या दोन्ही बाबतीत निष्पक्ष राहतील.

iii. अन्वेषकांनी निष्पक्षता, नेमके उद्दिष्ट, सखोलपणा, नैतिक वर्तन, आणि कायदेशीर तसेच व्यवसायिक मानदंड पाळणे कर्त्तव्याचे असते.

iv. अन्वेषणे केवळ सक्षम अधिका-याद्वारे प्राथमिक आढावा घेतल्यानंतरच सुरु केली जातील.

v. अन्वेषक सदैव गोपनीयता राखतील.

vi. अन्वेषक चौकशीतून निष्कर्ष काढतील आणि योग्य त्या कृती योजनेची शिफारस करतील.

vii. अन्वेषक आपला अहवाल सक्षम अधिका-याला सादर करतील.

**7. निर्णयः-**

जर एखाद्या तपासातून असा निष्कर्ष निघाला की एक अयोग्य किंवा अनैतिक कृती घडली आहे तर, सक्षम अधिकारी कंपनीला शिफारस करतील की लागू सेवा नियमांच्या तरतुदीखाली शिस्तभंगाची किंवा उपायात्मक कारवाई करण्यास आणि/किंवा लागू वैधानिक तरतुदींखाली कारवाई सुरु करण्याची शिफारस करतील.

सदर योजनेच्या अनुसार एखाद्या अन्वेषणातील निष्कर्षांच्या परिणामी प्रयोक्त्याच्या विरुद्ध कोणतीही शिस्तभंगाची किंवा उपायात्मक कारवाई सुरु केल्यास ती लागू कार्मिक किंवा कर्मचारी वर्तन आणि शिस्तभंग प्रक्रियेचे पालन करील.
जर सक्षम अधिका-याचे असे मत असेल की या अन्वेषणातून संरक्षित प्रकटनावर कोणतीही पुढील कारवाई करणे आवश्यक नाही असे प्रकट होत आहे तर, तो तशी लेखी नोंद करेल.

**8. अहवाल सादरीकरणः-**

सदर धोरणाखाली प्राप्त तक्रारींची संख्या, केलेले अन्वेषण आणि त्यांचे निष्कर्ष यांच्यावरील एक तिमाही अहवाल लेखा परीक्षण समितीसमोर मांडला जाईल.

सक्षम अधिका-याने घेतलेली कोणतीही कारवाई किंवा निर्णयाचा आढावा घेण्याचा अधिकार लेखा परीक्षण समितीला राहील.

**9. संरक्षणः-**

व्हिसल ब्लोअरने सदर पॉलिसीखाली एक संरक्षित प्रकटन केल्याबद्दल त्याला कोणतीही अन्यायकारक वागणूक दिली जाणार नाही. कंपनी, एक धोरण या स्वरुपात, कोणत्याही प्रकारचा भेदभाव, छळवणूक, आकस किंवा कोणत्याही अन्य प्रकारची अन्यायकारक रोजगार प्रथा व्हिसल ब्लोअर्सच्या विरोधात स्विकारण्याचा निषेध करते.

संरक्षित प्रकटन केल्याच्या परिणामी व्हिसल ब्लोअरला अनुभवाला येऊ शकेल अशा अडचणी कमी करण्यासाठी कंपनी पावले उचलेल.
व्हिसल ब्लोअरची ओळख शक्य तितकी आणि कायद्याखाली अनुमती असेल त्या प्रमाणात गोपनीय ठेवली जाईल.

सदर अन्वेषणात सहाय्य करणा-या कोणत्याही अन्य कर्मचा-याला देखील व्हिसल ब्लोअरच्या इतक्याच प्रमाणात संरक्षण दिले जाईल.

**10. गोपनीयताः-**

सदर धोरणाखाली मांडलेल्या सर्व चिंता आणि समस्या एक संपूर्ण, निष्पक्ष आणि परिणामकारक अन्वेषण करण्यासाठी आवश्यक प्रमाणाखेरीज गोपनीय पद्धतीने हाताळल्या जातील.

संबंधित व्हिसल ब्लोअर, प्रयोक्ता, सक्षम अधिकारी, लेखा परीक्षण समितीचे सदस्य, अन्वेषक आणि या प्रक्रियेत समाविष्ट प्रत्येक जण या प्रकरणाची संपूर्ण गोपनीयता/गुप्तता राखेल.

वरील नियमांचे पालन न करताना कोणी आढळल्यास, त्याला/तिला योग्य त्या शिस्तभंगाच्या कारवीस सामोरे जाण्यास पात्र समजले जाईल.

**11. कागदपत्रांचे जतनः-**

सर्व लेखी संरक्षित प्रकटने किंवा त्याच्याशी संबंधित अन्वेषणाच्या परिणामांसोबत असलेली कागदपत्रे कंपनीकडे किमान सात वर्षे कालावधीपर्यंत जतन केली जातील.

**12. सुधारणाः-**

कंपनीने सदर धोरणात संपूर्ण किंवा अंशतः, कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी दुरुस्ती किंवा सुधारणा करण्याचा आपला अधिकार राखून ठेवला आहे. सदर धोरणातील कोणतीही दुरूस्ती कंपनीच्या संचालक मंडळाद्वारे मान्यताप्राप्त आणि कंपनीच्या वेबसाईटवर होस्ट केल्याच्या दिनांकापासून प्रभावी राहील.